**ठळक बातम्या**

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत; अरविंद केजरीवाल,  मनिष सिसोदिया यांच्यासह आपच्या दिग्गज नेत्यांचा पराभव
- दिल्लीतल्या विजयाचा राज्यभरात भाजपा कार्यकर्त्यांकडून जल्लोष
- नवीन प्राप्तिकर विधेयक पुढच्या आठवड्यात संसदेत सादर होणार
- ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधे १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत महिला गटात महाराष्ट्राच्या संजीवनी जाधव हिला सुवर्णपदक

  **आणि**
- ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांपैकी भाजपानं सर्वाधिक जागा जिंकत निर्विवाद बहुमत मिळवलं आहे. भाजपाला ४८ जागा मिळाल्या असून सत्तारूढ आम आदमी पार्टीला केवळ २२ जागांवर समाधान मानावं लागलं आहे. दिल्लीत तब्बल २७ वर्षांनी भाजपाची सत्ता येणार आहे. नवी दिल्लीतून अरविंद केजरीवाल, जंगपुरातून मनीष सिसोदिया आणि ग्रेटर कैलाशमधून सौरभ भारद्वाज हे आपचे ज्येष्ठ नेते तर पूर्व दिल्लीतून काँग्रेसचे संदीप दीक्षित पराभूत झाले आहेत. कालकाजी मतदारसंघातून आपच्या अतिशी विजयी झाल्या आहेत. भाजपाचे पक्षश्रेष्ठी पुढचा मुख्यमंत्री ठरवतील,

असं केजरीवाल यांचा पराभव केल्यानंतर प्रतिक्रिया देताना परवेश वर्मा यांनी म्हटलं आहे.

अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

## होल्ड- व्हाईस कास्ट

*भाजपाचे परवेश वर्मा नवी दिल्लीतून, जंगपुरातून तरविंदर सिंग, करवाल नगरातून कपिल मिश्रा, राजौरी गार्डनमधून मनजिंदर सिंग सिरसा, गांधीनगरमधून अरविंदर सिंग लव्हली, ग्रेटर कैलाशमधून शिखा राॅय आणि मोती नगरातून हरिश खुराना हे विजयी झालेले प्रमुख नेते आहेत.   तर आपचे विजयी झालेले महत्त्वाचे उमेदवार असे - सदर बाजारातून सोम दत्त, बाबरपूरमधून गोपाल राय, दिल्ली कॅन्टोन्मेंटमधून विरेंदर सिंग कादिअन, कोंडलीतून कुलदीप कुमार, टिळक नगरातून जर्नेल सिंग विजयी झाले आहेत. या निवडणुकीत काँग्रेसचा सपशेल धुव्वा उडाला. खोट्या आश्वासनांनी जनतेची दिशाभूल करता येत नाही अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री* ***नरेंद्र मोदी यां****नी दिली आहे. उत्तम प्रशासन आणि विकासामुळे भाजपा विजयी झाला असून जनशक्ती सर्वश्रेष्ठ असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला जनतेची सेवा करणारं सरकार मिळाल्याचं केंद्रीय अर्थमंत्री* ***निर्मला सीतारामन*** *यांनी म्हटलं आहे. दिल्लीच्या जनतेनं भाजपावर विश्वास ठेवल्याचं सिद्ध झालं असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात दिल्लीचा संपूर्ण कायापालट होईल असं केंद्रीय मंत्री* ***नितीन गडकरी*** *यांनी म्हटलं आहे.*

*लोककल्याणकारी योजनांमुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेचा विश्वास जिंकला, असं केंद्रीय मंत्री* ***पियूष गोयल*** *यांनी आज मुंबईत सांगितलं. मतदारांनी दिलेल्या जनादेशाचा पूर्ण आदरानं स्वीकार करत असल्याची प्रतिक्रिया आपचे प्रमुख* ***अरविंद केजरीवाल*** *यांनी दिली आहे. आप यापुढे जबाबदार विरोधी पक्ष म्हणून दिल्लीतील जनतेच्या सेवेत असेल, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या दूरदृष्टीतून भाजपा सरकार दिल्लीचा विकास करेल असं नवी दिल्लीतले भाजपा उमेदवार* ***परवेश वर्मा*** *यांनी सांगितलं. आपचे* ***मनीष सिसोदिया*** *यांनी पराभव मान्य केला आहे. तर काँग्रेस आत्मपरीक्षण करेल असं काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या* ***प्रियंका*** *गांधी यांनी पक्षाच्या दारूण पराभवाबद्दल म्हटलं आहे. दिल्लीच्या जनतेने अरविंद केजरीवाल यांचा भ्रष्टाचार उघड केला असून जनतेने भाजपावर दाखवलेला विश्वास वाया जाणार नाही असं मुख्यमंत्री* ***देवेंद्र फडणवीस*** *यांनी म्हटलं आहे. केंद्र आणि दिल्ली विधानसभेतही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचारांचे डबल इंजिन सरकार आल्याने दिल्लीच्या सर्वांगीण विकासाला दुप्पट गती मिळेल, असं उपमुख्यमंत्री* ***अजित पवार*** *यांनी संदेशात सांगितलं.* ***अरविंद केजरीवाल यांनी प्रामाणिकपणाची भाषा केली, पण प्रत्यक्ष कृती वेगळी होती, मतदारांनी हा फरक ओळखला आणि म्हणून आपची मतं घसरली , अशी टीका ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केली.***

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विजयाचं श्रेय कार्यकर्त्यांना दिलं असून त्यांनी भाजपा कार्यालयात जाऊन अभिनंदन केलं. भाजपामधे आनंदाचं वातावरण आहे. दिल्लीतल्या भाजपा कार्यालयात कार्यकर्ते फटाके वाजवून आणि मिठाई वाटून विजय साजरा करत आहेत. **नागपूर**च्या भाजप कार्यालयाबाहेर ढोलताशे वाजवून जल्लोष करण्यात आला. **कोल्हापूर**च्या भाजपाने प्रमुख पदाधिका-यांच्या बैठकीनंतर पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. **धुळ्यात**ही भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

**<><><><><>**

येत्या आठवड्यात संसदेत नवीन प्राप्तिकर विधेयक आणलं जाईल, त्यानंतर ते संसदीय स्थायी समितीकडे पाठवलं जाईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सांगितलं. दिल्ली इथं रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. आर्थिक विकासाकरता आणि महागाईच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक एकत्र मिळून काम करत आहेत, असं सीतारामन यांनी सांगितलं. महागाई असो किंवा विकासाचा मुद्दा असो चलनविषयक धोरण आणि वित्तीय धोरण समन्वयाने आखलं पाहिजे, तरच जनतेला त्याचा लाभ होईल, असंही त्या म्हणाल्या.

जागतिक बाजाराच्या हालचालीवरून रुपयाची किंमत ठरते, रुपयाच्या दैनंदिन मूल्याबद्दल रिझर्व्ह बँकेला चिंता नाही, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले.

<><><><><>

कोल्हापूर जिल्हा वार्षिक योजनेचा वर्ष २०२५-२६ साठीचा ९४० कोटी रुपयांचा आराखडा आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सरकारला सादर करण्यात आला. केशवराव भोसले नाट्यगृह नूतनीकरण लवकरात लवकर पूर्ण करणं, मधाचं गाव पाटगाव अंतर्गत चांगल्या प्रतीच्या शुद्ध मधाचं उत्पादन वाढवून रोजगार निर्मितीला चालना देण्याच्या सूचना अजित पवार यांनी यावेळी केल्या.

<><><><><>

आधुनिक तंत्रज्ञान आणि जैविक खतांचा वापर करून शेतीची उत्पादन क्षमता वाढवावी लागणार असून शेतकऱ्यांना कृषिक्षेत्रात काळानुरूप होणारे बदल आता स्वीकारावे लागतील, असं प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे. डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहाता तालुक्यातल्या राजुरी इथं आयोजित केलेल्या 'डाळिंब बहार मेळावा' आणि 'कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कृषी क्षेत्रातल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाच सेंद्रीय शेतीलाही आपल्याला पुढे घेऊन जावं लागेल, असंही ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, भारत पर्यटन आणि नाबार्ड यांच्या सहकार्यानं चिकू महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. शेती, ग्रामीण उद्योजकता आणि समृद्ध ग्रामीण संस्कृतीचा मेळ पर्यटनाबरोबर घालून ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करणं आणि ग्रामीण जीवनाला सन्मान प्राप्त करून देणं, हा या महोत्सवाचा उद्देश आहे, अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून…

**<><><><><>**

नीट-युजी वैद्यकीय प्रवेश परीक्षा येत्या ४ मे रोजी घेण्यात येणार असल्याचं एन टी ए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया कालपासून सुरु झाली असून ती ७ मार्चपर्यंत चालणार आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक १०७ पदकं जिंकली असून त्यात २३ सुवर्ण, ३९ रौप्य आणि ४५ कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून ३९ सुवर्ण पदकांसह सेना दलं पहिल्या तर ३० सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे. १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत आज महिला गटात महाराष्ट्राच्या संजीवनी जाधव हिने सुवर्णपदक पटकावलं असून पुरुषगटात किरण माने याने रौप्य पदक पटकावलं आहे.

**<><><><><>**

रणजी क्रिकेट करंडक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत हरियाणा विरुद्ध मुंबई सामन्यात आज दिवसअखेरीस मुंबई संघाच्या ८ गडी बाद २७८ धावा झाल्या. सुरुवातीला नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेणाऱ्या मुंबई संघाची सुरुवात निराशाजनक झाली. अवघ्या २५ धावसंख्येवर त्यांचे ४ फलंदाज तंबूत परतले. नंतरच्या फलंदाजांनी डाव सावरला. शम्स मुलाणीने ९१ धावा काढत तनुष कोटियनबरोबर ११० धावांची महत्त्वाची भागीदारी केली. अखेर जयंत यादवच्या चेंडूवर त्यालाच झेल देऊन तो बाद झाला.

**नागपूर**मधे विदर्भ विरुद्ध तमिळनाडू हा सामना सुरु झाला. विदर्भ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दानिश मालेवारची पाऊण शतकी तर करुण नायरची शतकी खेळी हे आजच्या दिवसाचं वैशिष्ट्य. दिवसअखेर विदर्भची धावसंख्या ६ गडी बाद २६४ झाली होती.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांच्या पार्थिवावर आज दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. आज पहाटे मुंबईत त्यांचं राहत्या घरी निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढारीकार ग. गो. जाधव पुरस्कार तसंच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला होता. प्रबोधनकार ठाकरे यांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन त्यांनी केलं होतं. ‘गिरणगावचा पंढरी’ आणि ‘पत्रकार पंढरी’ ही त्यांची आत्मचरित्रं विशेष गाजली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी सावंत यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

**बुलडाणा** जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या अपघातात ३ जण ठार तर १ जण गंभीर जखमी झाले आहेत. मलकापूर जवळ उमाळी इथं दुचाकीची समोरासमोर धडक होऊन २ जणांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला.

**<><><><><>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी तर मराठवाड्यात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**